दि. - १५ जाने २०२०

'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा
निमित्त स्वलिखीत काव्यवाचन
कार्यक्रम अहवाल'

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व भाषेच्या संवर्धनासाठी राज्यभर दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी प्रतिवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणून साजरा करण्याचा निर्णय संदर्भाधीन दि. २२ जुलै २०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे, त्या अनुषंगाने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात कला शाखेच्या 'मराठी' विभागात स्वलिखीत कवितांचे काव्यवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषेचे जीवनातील स्थान, महत्व विशद करुन सौ. लेंढे बी. ए. मराठी विषय शिक्षिका यांनी कार्यक्रमाची सुरुवात / प्रस्तावना केली. त्यानंतर मराठी भाषेमध्ये स्वत: लिहिलेल्या कवितांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. कवितांचे उत्तम सादरीकरण, उत्तम लिखाण, उत्तम विषय यांतून पुढे आले. यामध्ये (मैत्री, शेती, शेतकरी व्यथा व वेदना आई) अशा विविध विषयांवर आपल्या कवितांचे प्रकट सादरीकरण केले.

Lendhe
१५/जाने/२०२०
सौ. लेंढे बी. ए.
(मराठी विभाग)

डॉ. गावडे आर. पी.
(मराठी विभाग प्रमुख)

प्रा.डॉ.राजाराम प्रभाकर गावडे
मराठी विभाग प्रमुख,
कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय

दि:- 14 जाने 2020

'लेखक होताना' कार्यशाळा
अहवाल....

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ जाने 2020 रोजी 'लेखक होताना' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेसाठी प्रमुख अतिथी म्हणून इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चाकणे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'कमवा व शिका' या विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी डॉ. तानाजी कसबे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख व सत्कार समारंभ डॉ. उबरंडे सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

* कार्यशाळेचा उद्देश / हेतु :-

'सदर कार्यशाळेचा हेतु हा विद्यार्थ्यांना स्वतः विषयी तसेच आजुबाजूच्या पर्यावरणाविषयी लिहते करणे हा होता. तसेच अभिव्यक्तीचे एक प्रभावी माध्यम म्हणून 'लेखन' कौशल्याची ओळख करून देणे हा होता.

* उद्देशपुर्तता :-

प्रा. डॉ. संजय चाकणे यांनी लेखनाचे विविध प्रकार (चरित्र, आत्मचरित्र, कथा, कादंबरी, पत्रलेखन) इ. विषयी मार्गदर्शन केले. यातून विद्यार्थ्यांना 'लेखन' या भाषिक कौशल्याची उत्तमरित्या ओळख झाली. तसेच 'लेखन' कौशल्याचे महत्त्व लक्षात आले. एकूण ४० विद्यार्थ्यांनी सदर 'लेखक होताना' या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रथम वर्ष कला शाखेचा विद्यार्थी सार्थक वाँकर याने केले. तर आभार प्रदर्शन डॉ. कसबे सरांनी मानले.

सदर कार्यशाळा महाविद्यालयाच्या शहीद अमरसोय सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडली.

Lendhe
15/1/2020

प्रा. सौ. लेंढे बी. ए
(मराठी विभाग)

डॉ. गावडे आर. पी.
(मराठी विभागप्रमुख)

प्रा.डॉ.राजाराम प्रभाकर गावडे
मराठी विभाग प्रमुख,
कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
इंदापूर,जि.पुणे, 413 106